# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 22 June 2025
# Time 18.10 to 18.20
# Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २२ जून २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- इस्राईल – ईराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर ईराणच्या राष्ट्रपतींशी पंतप्रधानांची चर्चा, शांतता प्रस्थापित करण्यासंदर्भात केलं आवाहन
- भारतानं इराणमधे अडकलेल्या अकराशे सतरा नागरिकांना मायदेशी परत आणलं
- योग दिनानिमित्त तीन लाख १०५ सहभागींसह सर्वात मोठ्या योगाभ्यासाची गिनिज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद

आणि

- बीड जिल्ह्यात पंधरा बालकामगारांची पोलिसांकडून सुटका

****

इस्राइल–ईराण युद्धात हस्तक्षेप करत, अमेरिकेने ईराणच्या तीन अण्वस्त्र ठिकाणांवर हल्ला केला आहे. वाढत्या युद्धाच्या या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज ईराणचे राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान यांच्याशी चर्चा करत या परिस्थितीवर चिंता व्यक्त केली. या युद्धजन्यस्थितीवर विस्तृत चर्चा झाल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या संदर्भात सामाजिक संपर्क माध्यमांवर दिलेल्या माहितीमध्ये नमूद केलं आहे. तणाव कमी करणं, चर्चा आणि कुटनितीच्या माध्यमातून प्रादेशिक शांतता, सुरक्षितता आणि स्थिरता प्रदान करण्याचा आपण यावेळी पुनरुच्चार केल्याची माहितीही पंतप्रधानांनी दिली आहे.

****

ऑपरेशन सिंधू अंतर्गत इराणमधे अडकलेल्या अकराशे सतरा भारतीय नागरिकांना आतापर्यंत मायदेशी परत आणल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी दिली. ऑपरेशन सिंधू अंतर्गत इराणमधून पहिल्या टप्प्यात ११०

नागरिकांना मायदेशी आणलं होतं. दुसऱ्या टप्प्यात २९०, तिसऱ्या टप्प्यात ११७, चौथ्या टप्प्यात ३१० नागरिकांना मायदेशी आणलं गेलं. तर पाचव्या टप्प्यात २९० नागरिक भारतात परतले. उरलेल्या नागरिकांनाही लवकरच मायदेशी परत आणलं जाईल, असं जयस्वाल यांनी सांगितलं.

****

जम्मू-काश्मीरच्या पहेलगाममध्ये झालेल्या अतिरेकी हल्ल्यात सहभागी दहशतवाद्यांना आश्रय देणाऱ्या दोन जणांना राष्ट्रीय तपास यंत्रणा-एन.आय.ए.नं अटक केली आहे. पहेलगाम परसरातल्या बतकोते भागातील परवेज अहमद जोथर आणि हील पार्क भागातील बशिर अहमद जोथर अशी अटक करण्यात आलेल्यांची नावं आहेत. या दोघांच्या चौकशीतून हल्ल्यात सहभागी तीन सशस्त्र अतिरेकी पाकिस्तानी नागरीक होते आणि अतिरेकी संघटना लष्करे तोयबाशी संबंधित असल्याचं निष्पन्न झालं आहे. पहलगाम इथं गेल्या २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ निर्दोष पर्यटकांचा मृत्यू झाला होता तर १६ जण गंभीर जखमी झाले होते.

****

केंद्र सरकारनं गेल्या ११ वर्षांच्या कार्यकाळात केलेल्या भरीव उपाययोजनांमुळं उर्जा सेवेत आमुलाग्र बदल झाले आहेत. ऐकू या अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून –

***गेल्या दशकात देशाच्या उर्जा क्षेत्रात भरीव वाढ झाली आहे. वाढती मागणी, महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा विकास, आणि पारंपरिक तसंच नवीकरणीय ऊर्जा स्रोतांसाठी धोरणात्मक पाठबळ यामुळं ही वाढ घडून आली आहे. जून २०२५ पर्यंत देशाची एकूण स्थापित वीज क्षमता ४७६ गिगावॅटपर्यंत पोहोचली असून, यापैकी जवळपास निम्मी क्षमता जीवाश्म इंधनाशिवाय अन्य स्रोतांमधून येते. एकट्या नवीकरणीय ऊर्जा स्रोतांद्वारे २२६ गिगावॅट वीज निर्मिती होत असून, भारत आता सौरऊर्जा क्षमतेत जगात तिसऱ्या क्रमांकावर आणि पवनऊर्जा क्षमतेत चौथ्या क्रमांकावर आहे. देशात एप्रिल २०१८ मध्ये १०० टक्के गावं प्रकाशानं उजाळून काढली आहेत, तर २ कोटी ८० लाखांहून अधिक कुटुंबांना वीज जोडणी दिली आहे. २०१४ मध्ये***

***चार टक्क्यांहून अधिक असलेल्या वीजटंचाईचं प्रमाण आज केवळ ०.१ टक्क्यांवर आलं आहे, तर प्रति व्यक्ति वीज वापरामध्ये ४५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. पीएम–सूर्य घर योजना देशभरातील घरं उजळवत आहे, तर पीएम–कुसुम योजना शेतकऱ्यांना सौरऊर्जेवर चालणाऱ्या सिंचन सुविधांद्वारे सक्षम करत आहे. पवनऊर्जा क्षेत्राची क्षमता दुपटीनं वाढली आहे, तर जलविद्युत, बायोमास आणि अणुऊर्जा क्षेत्रातली क्षमताही सातत्यानं वाढत आहे. त्याचवेळी, देशाच्या कोळसा क्षेत्राचं आधुनिकीकरण करण्यात आलं असून, आत्मनिर्भरतेसह शाश्वततेकडे वाटचाल करत उच्च उत्पादन पातळी गाठली आहे आणि आयातीवरील अवलंबन मोठ्या प्रमाणात कमी झालं आहे. नॅशनल ग्रीन हायड्रोजन अभियानापासून ते आंतरराष्ट्रीय सौर आघाडीपर्यंत, भारत केवळ आपली ऊर्जा गरज भागवत नाहीये, तर स्वच्छ आणि हरित भविष्याकडे वाटचाल करत आहे.***

****

आंध्रप्रदेशातील विशाखापट्टणमध्ये काल अकराव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त तीन लाख १०५ सहभागींसह सर्वात मोठ्या योगाभ्यासाची गिनिज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद करण्यात आली आहे. योगामुळं लोक पुन्हा एकदा एकत्र आले असून योगांध्र उपक्रम आणि विशाखापट्टणममधील कार्यक्रम हा सहभागी लोकांना चांगले आरोग्य आणि कल्याणासाठी प्रेरित करेल असं पंतप्रधान मोदी यांनी म्हटलं आहे. योगाला जीवनाचा भाग बनवण्याच्या चळवळीला दिलेल्या उदंड प्रतिसादाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रशंसा केली आहे.

****

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी भरवलेल्या जनता दरबारात आज ९२ प्रकरणं मार्गी लावण्यात आली. मुंबईतल्या कांदिवलीतील त्यांच्या लोककल्याण कार्यालयात नियमित जनता दरबार भरवून नागरिकांच्या तक्रारींची दखल घेतली जाते. आजच्या जनता दरबारात महानगरपालिका, म्हाडा, गृहनिर्माण संस्थांपासून ते थेट पोलिस ठाण्यात दखल घेतली जात नसल्याच्या प्रकरणांचा समावेश होता. या संदर्भात तत्परतेनं कार्यवाही करण्याचे निर्देश मंत्री गोयल यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिले.

****

संसदेच्या अंदाज समितीच्या कार्यारंभाला ७५ वर्षे पूर्ण होत असून, या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त एक महत्त्वपूर्ण राष्ट्रीय परिषद उद्या आणि परवा मुंबईत विधान भवनात होत आहे. या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत 'प्रशासकीय कामं सक्षमपणे आणि कमी खर्चात होण्याकरता अर्थसंकल्पीय अंदाजांचं पुनर्विलोकन आणि प्रभावी नियंत्रणात अंदाज समितीची भूमिका' या विषयावर विचारमंथन होईल.

****

कारगील विजय दिवसानिमित्त लडाखमध्ये आयोजित सरहद शौर्यथॉनला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज हिरवा झेंडा दाखवला. या मॅरेथॉनमध्ये देशभरातून अडीच हजारांहून अधिक धावपटू सहभागी झाले असून यातून देशाचा आपल्या लष्करावरचा दृढ विश्वास दिसून येत असल्याचं शिंदे यांनी यावेळी सांगितलं. कारगिल युद्ध स्मारकासाठी महाराष्ट्र सरकारतर्फे तीन कोटी रुपयांचा धनादेश त्यांनी यावेळी लष्कराकडे सुपूर्द केला.

****

नाशिक आणि त्रंबकेश्वर इथं २०२७ मधील कुंभमेळ्यात येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी राष्ट्रीय महामार्गासंबंधी सोयीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र दिलं होतं. त्यानुसार केंद्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज नागपूरच्या हैदराबाद हाऊस इथं फडणवीस यांच्यासोबत आढावा बैठक घेतली. यावेळी कुंभमेळ्यासाठी छत्रपती संभाजीनगर, नागपूर, खान्देश तसंच राज्याच्या सहा दिशातून नाशिककडे येणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचं रुंदीकरण, बळकटीकरण तसंच सुविधांसाठी गडकरी यांनी मान्यता दिली, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी पत्रकारांना दिली.

****

बीड जिल्ह्याच्या आष्टी तालुक्यात गहूखेल तांडा आणि सेवालाल लमान तांडा इथं काम करणाऱ्या १५ बालकामगारांची पोलिसांनी सुटका केली आहे. यात नऊ मुली तर सहा मुलांचा समावेश असून त्यांच्याकडून जनावरांची राखण करण्यापासून ते धुणीभांडी आणि अन्य कामं करून घेतली जात होती. यातली दोन मुलं तिथून सुटका करून अहिल्यानगर शहरात पोहचल्यानंतर पोलिसांच्या चौकशीतून हा प्रकार समोर आला. सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीनं ही सुटका करण्यात आली. बाल कल्याण समितीचे अध्यक्ष अशोक तांगडे या संदर्भात माहिती देताना म्हणाले –

**बाईट – अशोक तांगडे, अध्यक्ष, बाल कल्याण समिती**

****

मुंबईतल्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर आज दोन कर्मचाऱ्यांना गुप्तचर यंत्रणेच्या पथकानं तस्करीच्या गुन्ह्यात अटक केली आहे. त्यांच्या ताब्यातली सुमारे साडे चार किलो सोन्याची भुकटी या करावाईत जप्त करण्यात आली आहे. याची अंदाजित किंमत चार कोटी २४ लाख रुपये असल्याची माहिती यंत्रणेतर्फे देण्यात आली आहे.

****

मराठवाडा साहित्य परिषदेच्या नांदेड शाखा कार्यकारिणीची निवडणूक बिनविरोध झाली असून अध्यक्षपदी बालाजी इबितदार यांची निवड करण्यात आली आहे. नांदेड इथं झालेल्या या निवडणुकीत उपाध्यक्षपदी दिगंबर कदम, श्रीनिवास मस्के तर कार्यवाह पदी प्राध्यापक महेश मोरे यांची निवड करण्यात आली. निवडणूक अधिकारी म्हणून डॉ जगदीश कदम तर निवडणूक निरीक्षक म्हणून संजीव कुलकर्णी आणि देवीदास फुलारी यांनी काम पाहिले. नूतन कार्यकारिणीत सहकार्यवाहपदी राम तरटे, कोषाध्यक्षपदी व्यंकटेश चौधरी यांची निवड करण्यात आली. कार्यकारणी सदस्य म्हणून योगिनी पांडे सातारकर, ललिता शिंदे–बोकारे, शेख गवंडगावकर, अनुजा डोईफोडे, धाराशिव शिराळे, व्यंकटेश काटकर आणि संजय जगताप यांची निवड करण्यात आली आहे. या कार्यकारिणीचा कालावधी २०३० पर्यंत आहे.

****

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेली संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांची पालखी आता पुणे इथं दिवे घाटाचा अवघड टप्पा पार करून शिंदेवाडी इथला विसावा घेऊन सासवडकडे मार्गस्थ झाली आहे. तर दुसरीकडे संत श्री तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा मांजरीमार्गे लोणी काळभोरच्या मुक्कामी पोहोचत आहे. अहिल्यानगर इथं आज संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखीचं जल्लोषात स्वागत करण्यात आलं. छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरून संध्याकाळी ही दिंडी शहरात पोहचली.

****